Estd. 1962

'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

४७ /२०२५

**विषय – खरेदी प्रक्रिया, ई-निविदा व जेम पोर्टल बाबत नियम व अंमलबजावणी**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी यांना कळविण्यात येते की, Academy for Academic Administration व वित्त व लेखा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "**खरेदी प्रक्रिया, ई-निविदा व जेम (GeM) पोर्टल**" या विषयावर सविस्तर कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. या कार्यशाळेमध्ये संबंधित प्रक्रियेचे प्रत्यक्ष मार्गदर्शन, नियम, अंमलबजावणी व व्यवहार्य बाबी यांची सखोल माहिती व मार्गदर्शन देण्यात येणार आहे.

या कार्यशाळेला प्रमुख वक्ते/मार्गदर्शक म्हणून श्री**. रमेश व. कुलगोड, माजी उपसंचालक, वित्त व लेखा विभाग, महाराष्ट्र शासन** हे उपस्थित राहणार असून, ते मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या अनुभवातून खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ व कार्यक्षम पद्धतीने राबविण्यास मदत होईल. सदर कार्यशाळा **दि. २० सप्टेंबर २०२५** रोजी ठीक **दुपारी ३.०० वाजता, राजश्री शाहू (सिनेट) हॉल** येथे आयोजित केली असून सदरील कार्यशाळेस सर्व विभागप्रमुख, प्रकल्पप्रमुख, अधिकारी व संबधित विभागातील खरेदी प्रक्रिया करणारे सर्व कर्मचारी यांनी वेळेत उपस्थित राहून या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, कार्यशाळेस संबंधितांनी हजर राहणे अनिवार्य आहे.

**कुलसचिव**

**जा. क्र. आस्थापना/** 1904

**दि.** 19 SEP 2025

**प्रति,**

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक

२) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.

३) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेस्थळावर प्रसिध्द करावे.